# ‘प्रसिध्दी पत्रक’
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

**मंगळवार, दि.१७/०९/२०१९**

---

## “अल्पवयीन मुलीवर लैंगीक अत्याचार.”

**पोलीस ठाणे, ढोकी:** १) आकाश सुभाष पवार २) करीम रब्बानी शेख दोघे रा. तेर, ता.जि.उस्मानाबाद यांनी संगणमत करुन एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस तिच्या आई-वडील व भावास जिवे ठार मारण्याची धमकी देवुन वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया अनोळखी व्यक्तींकडुन अनेकवेळा जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. तसेच अत्याचार करण्याऱ्या व्यक्तींकडुन त्याने पैसे घेतले. अशा मजकुराची पिडीत अल्पवयीन मुलीची फिर्याद बाल कल्याण समिती लातुर यांच्याकडुन प्राप्त झालेवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, ढोकी येथे भा.दं.वि. कलम ३७६, ३७६ (२) (एन), ३६३, ३६३ (अ), ३४२, ५०६, ३४ सह पोक्सो कायदा कलम ६, ८, १२ सह पीटा कायदा कलम ५ सह अ.जा.ज.अ.प्र. कायदा कलम ३ (२) (व्ही) (ए), ३ (१) (आर) (एस) (डब्ल्यु) प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## “अप्रमाणित खत विक्री प्रकरणी खत कंपनीवर कारवाई.”

**पोलीस ठाणे, परंडा:** दि. २७.०५.२०१९ रोजी १३.३० वा.सु. किशोर बापुसाहेब अंधारे निरीक्षक तथा कृषी अधिकारी पंचायत समिती, परंडा यांनी निशा ॲग्रो एजन्सी, परंडा या खत विक्री परवाना धारक विक्री केंद्राची तपासणी केली. तपासणीमध्ये बालाजी फॉस्फेट प्रा.लि. देवास, मध्यप्रदेश या कंपनीचे उत्पादीत व वितरीत, सिंगल सुपर फॉस्फेट दाणेदार खताच्या नमुन्याची नियंत्रक प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे तपासणी केली. खत नियंत्रक प्रयोगशाळा, औरंगाबाद यांचा सदर खत नमुना मुळ घटकामध्ये अप्रमाणित घोषीत करण्यात आला असले बाबत अहवाल प्राप्त झालेवरुन किशोर बापुसाहेब अंधारे यांच्या फिर्यादीवरुन अनिल दत्तात्रय चांदेकर विभागीय व्यवस्थापक, कंपनी मालक, संचालक, रसायन शास्त्रज्ञ, व्यवस्थापक, उत्पादनास जबाबदार असलेल्या बालाजी फॉस्फेट प्रा.लि. देवास मध्यप्रदेश २४ ए, २३ बी. इंडस्ट्रीयल एरिया नं. १ ए.बी.रोड देवास मध्यप्रदेश येथील सर्व व्यक्ती यांच्या विरुध्द पोलीस ठाणे, परंडा येथे भा.दं.वि. कलम ४२० सह खत नियंत्रण आदेश १९८५ मधील खंड २ (एच), १२, १३ (१), (ए), १९ (ए), २१, २१ (ए) सह अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ कलम ७ प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “बस चालकास मारहान करुन शासकिय कामात अडथळा.”

**पोलीस ठाणे, उमरगा:** दि. १६.०९.२०१९ रोजी १६.४५ वा.सु. दत्तात्रय शेषेराव मुरटे एस.टी.बस चालक रा. कोंडजीगड, ता. लोहारा यांनी बस. क्र. एम.एच. २० बी.एल. ०८१८ ही प्रवाशी घेण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उमरगा येथे थांबवली होती. त्यावेळी कार. क्र. एम.एच. २४ सी. ८२८८ मधील ३५ ते ४० वयोगटातील अनोळखी चार पुरुषांनी “तु रस्त्यात गाडी का उभा केलीस दादागिरी करतो काय” असे म्हणुन दत्तात्रय मुरटे यांना शिवीगाळ केली, व धक्काबुक्की करुन त्यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. तसेच एस.टी. बसच्या समोरील काचावर हाताने बुक्की मारल्याने काचेला तडे जावुन बसचे नुकसान केले. अशा मजकुराच्या दत्तात्रय मुरटे यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, उमरगा येथे भा.दं.वि.

कलम ३५३, ३४१, ३२३, ५०४ सह सार्वजनिक मालमत्ता विद्रुपन कायदा कलम ३ प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"महिलेचा विनयभंग."**

**पोलीस ठाणे, परंडा:** दि. १६.०९.२०१९ रोजी २१.३० वा.सु. एक महिला व तिचा पती मोटारसायकलवरुन जात असतांना राजेश मोहन काळे रा.परंडा, ता.परंडा याने त्यांना आडवुन महिलेचा हात पकडुन मोटारसायकलवरुन खाली ओढुन महिलेच्या मनास लज्जा वाटेल असे वर्तन केले. तसेच सदर महिला व तिच्या पतीस शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन वरील आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, परंडा येथे भा.दं.वि. कलम ३५४, ५०९, ३४१, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"वाशी: विद्युत खांबावरील विद्युत तारेची चोरी."**

**पोलीस ठाणे, वाशी:** दि. १५.०९.२०१९ रोजी २२.०० ते दि. १६.०९.२०१९ रोजी ०६.०० वा. चे दरम्यान इंदापुर शिवारातील सर्वे नं. १२४ मध्ये महावितरणच्या पाच विद्युत खांबावरील ॲल्युमिनीयम धातुची एलटी. लाईनची २,४०० फुट विद्युत तार किं.अं. २४,०००/-रु. कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली आहे. अशा मजकुराच्या रेणुका श्रीरंग पत्की सहायक अभियंता, वाशी यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरटयाविरुध्द पोलीस ठाणे वाशी येथे भारतीय विद्युत कायदा कलम १३६ प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"पानटपरी / दुकानांचे पत्रे कापुन सामानाची चोरी."**

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** दि. १६.०९.२०१९ रोजी रात्री २२.०० ते दि. १७.०९.२०१९ रोजी ०७.०० वा.चे दरम्यान सिंदफळ शिवारात राष्ट्रीय महामार्ग क्र. ५१ लगत महंमदशरिफ हुसेन कोतवाल, रा.सिंदफळ यांच्या शेतामध्ये असलेल्या पत्र्याच्या गाळयामधील सहा पानटपरी / दुकानाचा पाठीमागुन पत्रा कापुन ५०,०००/-रु. चा माल (खाद्यतेल,सिगारेट,चॉकलेट,पॅन्ट,टी-शर्ट,गॅस सिलेंडर व रोख रक्कम) कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेला आहे. अशा मजकुराच्या महमंदशरिफ हुसेन कोतवाल यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, तुळजापूर येथे भा.दं.वि. कलम ४६१, ३८० प्रमाणे गुन्हा दि. १७.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"जुगार अड्डयावर छापा."**

**पोलीस ठाणे, कळंब:** दि. १६.०९.२०१९ रोजी १४.१५ वा. १) विष्णु महादेव वाघमारे रा.सावरगाव, ता. कळंब २) गणेश मारुती वैरागे रा.युसूफ वडगाव, ता.केज, जि.बीड हे होळकर चौक, कळंब येथे कल्याण मटका नावाचा जुगार खेळत असतांना जुगाराचे साहित्य, व रोख रक्कम १,२२०/-रु. च्या मालासह पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे म.जु.का. कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** दि. १६.०९.२०१९ रोजी १४.१५ वा. १) भिमराव बळीराम देडे रा. काक्रंबा, (ह.मु. तुळजापूर) २) भारत भगवानसिंग राजपुत रा. तुळजापूर हे घाटशिळ पार्किंग, तुळजापूर येथे कल्याण मटका नावाचा जुगार खेळत असतांना जुगाराचे साहित्य, व रोख रक्कम ४,२३०/-रु. च्या मालासह स्थानिक गुन्हे

शाखा, उस्मानाबाद यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, तुळजापूर येथे म.जु.का. कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“अवैध मद्य विक्री विरुध्द २ कारवाया”**

**पोलीस ठाणे, बेंबळी:** दि. १६.०९.२०१९ रोजी १९.४५ वा.सु. भारत वसंत शिंदे रा. बामणी, ता.जि.उस्मानाबाद हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे बामणी येथे देशी दारुच्या बाटल्या किं.अं. ८४०/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, बेंबळी यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, बेंबळी येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**पोलीस ठाणे, कळंब:** दि. १७.०९.२०१९ रोजी ११.०५ वा.सु. साखरबाई किसन शिंदे रा. मोहा, ता.कळंब ह्या दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे मोहा येथे १० लिटर गावठी दारु कॅनसह किं.अं. ५५०/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आल्या. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १७.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**“मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन: १०६ कारवाया.”**

**उस्मानाबाद जिल्हा:** दि. १६/०९/२०१९ रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व जिल्हा वाहतुक शाखा उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार १०६ कारवाया केल्या असुन त्यातुन २३,३०० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल करण्यात आले आहे.

---

**स्वाक्षरीत**

म.पोलीस उपनिरीक्षक

जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद